**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) ला संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामधून जाणा-या ५.६ कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

**संदर्भः-** १) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार.

२) भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४-०९-२०२० चे निर्देश

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे क्रं.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२० चे निर्देश

-------------

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर

आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) ला संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामधून जाणा-या ५.६ कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार – सोमवार, दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय, मोरबे, तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड येथे आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- २० ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०२२४ एफटीएस ०१८५ दिनांक २४-०२-२०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - **आयोजक**

श्री सचिन आडकर, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास उर्वरित व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधी देण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे ऑनलाईन जनसुनावणीसुध्दा चालू असून कोणीही त्यात भाग घेऊ शकते. त्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या स्थानी प्रवेशव्दाराजवळ करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक यांनी डॉ. पद्मश्री बैनाडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री धनंजय पाटील,

प्रादेशिक अधिकारी, रायगड, म.प्र.नि. मंडळ, नवी मुंबई तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री आडकर यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, रस्ते, सडक परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रस्तावित वडोदरा मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुख्य आखणीच्या कि.मी. २६.५८२ (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी. ०+०००) पासून सुरु होणा-या आणि एमएमआरडीएच्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शन (स्पर आखणीचे डिझाईन कि.मी.७९+७८३) ला संपणा-या आठ पदरी स्पर विकास परियोजनेच्या रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामधून जाणा-या ५.६ कि.मी. पट्ट्याच्या प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प

प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग ए – ७ (एफ) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी दिनांक १३ जुलै, २०१९ रोजी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १६ मार्च, २०२० रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती – Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक १५-०३-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, रायगड यांनी मान्यता दिलेली आहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक कृषिवल व लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १३-०२-२०२१ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर – ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, अलिबाग, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, तहसीलदार, तहसील कार्यालय-पनवेल, जिल्हा – रायगड, ग्रामपंचायत, कार्यालय-, वांगणी तर्फे तळोजे, करंबेली तर्फे तळोजे, शिरवली, अंबे तर्फे तळोजे, मोरंबे, महाळुंगी, तालुका – पनवेल, जिल्हा - रायगड, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक अधिकारी – रायगड, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ६ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ६ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई , व मप्रनि मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री आडकर यांनी पर्यावरण विषयक

जाहिर लोकसुनावणीसाठी सादरीकरण करण्याची विनंती प्रकल्प प्रवर्तकांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू द्रुतगती मार्ग वसई तालुक्यातील कोशिंब गाव येथून सुरु होतो व रायगड जिल्ह्यातील मोरबे गावात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) च्या मल्टी मोडल कॉरिडॉर सोबतच्या प्रस्तावित जंक्शनवर संपतो. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील एकूण सहा गावे बाधित होणार असून रायगड जिल्ह्यात ५.६२३ कि.मी. लांबीचा स्पर आखणीचा द्रुतगती मार्ग विकसित करण्यात येईल.

सादरीकरणानंतर अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की कोविडच्या पार्श्वभूमीवर ही जनसुनावणी आयोजित करण्यात आल्याने त्यांनी मुखपट्टी/मास्क व्यवस्थित घालावी. त्यांनी सादरीकरणानंतर एखादा मुद्दा समजला नसला तर तो विचारण्याचे आवाहन केले. त्यांनी उपस्थितांना प्रकल्पाबाबत काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>किरण दशरथ पाटील, राहणार-नेरे गाव, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

श्री किरण पाटील यांनी सांगितले की माझी जमिन बाधित झालेली आहे. महाराष्ट्रात एवढा मोठा प्रकल्प सुरु करण्याचा घाट घातलेला असताना ज्यांच्या जमिनी बाधित होणार आहेत, त्या शेतक-यांना किती मोबदला मिळणार आहे, याबाबत कोणतीच वाच्यता न होता शासकीय

यंत्रणा कामाला लावली आहे. तर ज्यांच्या जमिनी बाधित होणार आहेत, त्यांची परवानगी आहे काय, त्यांना जो मोबदला दिला जाणार आहे तो मान्य आहे काय याबाबत काहीही विचारणा झालेली नाही. जर मोबदला मान्य झाला नाही, तर स्थानिक शेतकरी आपल्या जमिनी प्रकल्पास कशा देतील हा माझा पहिला प्रश्न आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तरे दिले की आपला प्रश्न लक्षात आलेला आहे. मात्र सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. मात्र विषय चर्चेसाठी उपस्थित करण्यात आलेला असल्याने सांगतो की सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे एनएच अँक्ट, १९५६ नुसार सक्तीचे भूसंपादन करण्यात येत आहे. याठिकाणी अधिसूचना प्रकाशित झाल्यानंतर शासन सदरहू जमिन ताब्यात घेते. आपणास किती मोबदला मिळणार हे माहीत नाही, तर पनवेल तालुक्यात ज्या जमिनी जाणार आहेत, त्यांचे निवाडे झालेले असून त्यांच्या मोबदल्याचे जोरात कामकाज चालू आहे. तरी आपण प्रांत कार्यालयात त्याबाबत संपर्क साधावा. प्रांत कार्यालयात वडोदरा- मुंबई द्रुतगती महामार्गासाठी वेगळा कर्मचारी समुह कार्यरत आहे. त्याठिकाणी आपण आपला सर्व्हे नंबर व गावाचे नांव सांगितल्यास संपूर्ण माहिती मिळू शकेल. ही वडोदरा- मुंबई द्रुतगती महामार्गासाठी जनसुनावणी आहे आणि मुंबईचा मल्टी नोडल कॉरिडर प्रकल्प (एमएमआरडीएचा) हा दुसरा प्रकल्प असून त्याचेही भूसंपादन चालू आहे. कदाचित त्याचेही भूसंपादन चालू आहे. त्या कर्मचारी समुहांकडे आपणास माहिती मिळू शकेल. निवाडे हे घोषित करण्यात आलेले आहे.

यावेळी श्री किरण पाटील यांना आक्षेप नोंदविला की आम्ही ब-याच वेळी प्रांत कार्यालयात गेलेलो असून बैठकीत मोरबे गावाचे ग्रामस्थ उपस्थित आहेत. आम्हांला मोबदला व पैशाचे वाटप याबाबत काहीही माहिती सांगण्यात आलेली नाही.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली आपण आजच्या जनसुनावणीचा संदर्भ देऊन लेखीस्वरुपात अर्ज प्रांत कार्यालयात सादर करावा व त्यात  सात दिवसात संपूर्ण माहितीसाठी उपलब्ध करण्याची विनंती करावी. आपणास संपूर्ण माहिती मिळेल.

२) **श्री संजय कृष्णा पाटील, राहणार-मोरबे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-**

सदरहू प्रकल्प आखणी ही दहा वर्षांपूर्वीची आहे.  तरी दहा वर्षांनी वाढलेली महागाई, जमिनीचे भाव यांचा विचार करुन अतिरिक्त मोबदला प्रकल्पग्रस्तांना अदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे काय? आताची महागाई व सद्यपरिस्थितीनुसार जमिनीचे मुल्यांकन (Valuation) करण्यात यावे व त्याप्रमाणे मोबदला प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावा.

त्याचप्रमाणे त्यांनी दुसरा प्रश्न विचारला की विकसित होणा-या रस्त्यासाठी किती अंतर ठेवणार आहेत याची माहिती द्यावी.  कारण जर मोरी दोन कि.मी. अंतरावर ठेवली, तर मला रोज चार कि.मी. जावे लागेल. माझी अर्धी शेती ही एकाबाजूला तर अर्धी दुस-या बाजूला असेल.  तरी मोरी बांधण्याचे अंतर सांगण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पाचे नियोजन हे दहा वर्षांअगोदरच करण्यात आलेले आहे.  त्याचप्रमाणे आपण आताच्या स्थितीत जमिनीचे मुल्यांकन वाढवून मागितले आहे.   तर भूसंपादन नियमांनुसार एखाद्या गावातील जमिन अधिग्रहित करताना भूसंपादन प्रक्रियेसाठी अधिसूचना प्रकाशित करण्यात आलेली तारीख ज्यास क्लॉज ३ ऐ (Clause 3A) म्हणतात, त्या तारखेस जो दर असेल, त्यानुसार जमिनीचे मुल्यांकन करण्यात येते.  आपल्या गावातील जमिन अधिग्रहित

करण्याची अधिसूचना (क्लॉज ३ ऐ) ज्या तारखेस प्रकाशित करण्यात आली व त्यादिवशी जो दर होता, त्याप्रमाणेच दर जमिन, झाडे, विहिरी, बोअर वेल यांना अधिग्रहित करताना अदा करण्यात येईल. आपणास सगळयाचा मोबदला हा देय असतो, मात्र तो त्या तारखेला असलेल्या दराप्रमाणेच मिळतो.

प्रकल्प प्रवर्तकांनी दुस-या प्रश्नास उत्तर दिले की रस्ता झाल्यावर क्रॉसिंग करतानाचे अंतर किंवा त्रास हा प्रश्न सर्व भारतात आहे. एक्सप्रेस वे असल्याने दोन्ही बाजूस कुंपण असते. त्यामुळे रस्त्यावर चढता येत नाही. मात्र येथे कुठलाही रस्ता हा एकमेकांना क्रॉस होणार नाही. म्हणजे वडोदरा रस्ता हा वरुन जाईल किंवा खालून जाईल. त्यामुळे मोठ्या रस्त्याच्या वाहतुकीस अडथळा येणार नाही. ग्रामीण भागात पायवाटा असतात. तर फक्त राष्ट्रीय व राज्यस्तरिय रस्ते असतील, त्याठिकाणीच बोगदा पुरविण्यात येईल. त्याचप्रमाणे गावातील/स्थानिक जी वाहतुक असते, त्यास Vehicle Under Pass असे म्हणतो. त्याची तरतुद केलेली असते. जेथे शेतजमिन जास्त आहे, त्या भागात जनावरांनाही क्रॉस करण्यासाठी बोगदे बांधण्यात येणार आहेत. रस्त्याच्या एका बाजूने दुस-या बाजूस जाण्यास पुरेशी व्यवस्था करण्यात येईल. एक्सप्रेस वेच्या निष्कषांनुसार ५०० मीटर्सपेक्षा जास्त क्रॉसिंगसाठी स्थानिकांना चालावे लागणार नाही.

**३) <u>श्री यशवंत पांडुरंग पाटील, राहणार-शिरवली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-</u>**

या प्रकल्पात आमच्या कुटुंबाची ७-८ हेक्टर जमिन बाधित होत आहे. आम्हांला २-३ महिन्यांनी ताबा देण्याचा व मोबदला घेण्याच्या नोटीसा प्रांत कार्यालयाकडून येत असतात. प्रांत अधिकीर यांना भेटण्यास गेलो असता ते ताबा घेण्यास येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी आम्ही निर्दशानास आणले की ताबा हा शासनाकडे असून फक्त पीके काढण्याचा आम्हांला अधिकीर आहे. मात्र याबाबत एकही बैठक किंवा जाहिर

जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली नाही. तरी आजच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत आमची व्यथा मांडण्याची संधि दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त करतो.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आपल्या गावातील जमिनीचे जे निवाडे झाले, त्याच्या प्रती प्रांत कार्यालयात आपणास मिळतील. जर आपण समाधानी नसाल तर बैठकीत केलेल्या चर्चेनुसार आपण लेखी अर्ज सादर करावा. त्याची प्रत भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालयासही देण्यात यावी. आपणास माहिती उपलब्ध करण्यासाठी हे कार्यालय पाठपुरावा करेल. जमिन मोजणी करताना वनखात्याची जमिन, खाजगी जमिन याबाबत त्या त्या नियमांनुसार मोजणी करण्यात येते. तरी सर्व माहिती उपलब्ध करण्यासाठी लेखी अर्ज सादर करण्यात यावा.

४) **श्री गणेश गणपत म्हात्रे, राहणार-मोरबे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी प्रश्न विचारला की आमची जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे. तरी आम्हांला प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात यावा. त्याचप्रमाणे शासनाने गावातील गायरान व गुरेचरण जागा अधिग्रहित केलेली आहे. तरी त्याचा मोबदला कोणाला देणार वा त्याबाबत काय निर्णय घेण्यात येईल याची माहिती स्थानिकांना देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी परत आवाहन केले की सदरहू सुनावणी ही पर्यावरणविषयक प्रश्नांसाठी आहे. आपण उपस्थित करत असलेल्या सूचना, आक्षेप या पर्यावरणविषयक नसून मोबदल्याबाबत आहे. सदरहू विषय हा ह्या जनसुनावणीचा नाही. यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्नकर्त्याला मार्गदर्शन करण्यात यावे अशी सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपण गायरान, गुरचरण जागेबाबत उपस्थित केलेली शंका ही प्रांत अधिकारी यांच्या कार्यकक्षेतील आहे. केंद्र शासनाने प्रांत अधिकारी जे भूसंपादन

अधिकारी आहेत, त्यांना सक्षम प्राधिकारी (Competent Authority) घोषित केलेले आहे. सार्वजनिक जागा उदा. बगिचा, स्मशानभूमी, गायरान, सरकारी बांधकाम याबाबत ते निर्णय घेत असतात. त्यांच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री गणेश म्हात्रे यांनी प्रश्न विचारला की प्रकल्पग्रस्तांना दाखला देण्यात येईल काय व भविष्यातील रोजगार निर्मितीत प्रकल्पग्रस्तांच्या वारसदारांना प्राधान्य देण्यात येईल काय याबाबत विचारणा केली. त्यावेळी उत्तर देताना प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की हाही विषय प्रांत अधिकारी जे भूसंपादन अधिकारी असतात, त्यांच्या कार्यकक्षेत येतो. त्यांच्या कार्यलयासोबत संपर्क साधण्यात यावा.

यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की National High Way Land Acquisition Act प्रमाणे जे काही देय लागेल, ज्या तरतुदी आहेत, त्या सर्व गोष्टी प्रकल्पग्रस्तांना देण्यात येईल. मात्र त्या तरतुदी कायद्यात असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गायरान व गुरेचरण जागा याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की जरी गायरान वा गुरे चरण जागा ही ग्रामपंचायत किंवा महसूल विभागाच्या ताब्यात असेल व ती अधिग्रहित करावी लागली, तर जेवढी जागा गायरान वा गुरे चरण जागा ही राखीव ठेवणे बंधनकारक आहे, तेवढी जागा ही गावात राखीव ठेवण्यात येईल. गावात गायरान व गुरे याबाबत महसूल विभाग खात्री करेल. गावात गायरान वा गुरे चरण जागा नाही असे कधिच होणार नाही.

**याबरोबरच श्री धनंजय बी. पाटील, प्रादेशिक अधिकारी,म.प्र.नि.मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती समिती सदस्य यांनी खालील मुददे उपस्थित केले. -**

श्री धनंजय पाटील, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येते मत मांडले की प्रकल्प प्रवर्तकांनी सादरीकरण हे संपुर्ण प्रकल्पाचे दर्शविले. ते फक्त पनवेल तालुक्याचे दर्शविणे योग्य होते, कारण ही जनसुनावणी फक्त पनवेल परिसरातील प्रकल्पाबाबत आहे. त्यांनी पुढे विचारणा केली सहा ठिकाणी देखरेख (Monitoring) केलेली आहे. तर एका ठिकाणी वांजे तळोजा येथे बेन्झिन हे जास्त दाखविले आहे. ते प्रमाण ०.८ ते ०.१ पीपीएम दर्शविले आहे. तरी कुठल्या जागी मॉनिटरिंग केले, ते सांगण्यात यावे.

त्यांनी पुढील प्रश्न विचारला की आपण मातीचे नमुने गोळा केलेले आहेत. त्यात एका ठिकाणी आपण ॲसिडिक माती (Acidic Soil) असल्याचे दर्शविले आहे. तरी ते स्थळ/जागा सांगण्यात यावी, जेणेकरुन म.प्र.नि.मंडळाकडून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढे हॉट मिक्स प्लँट वा स्टोन क्रशरबाबत प्रश्न विचारताना सूचना केली की पनवेलमध्ये कुठे कार्यान्वित करणार याची माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे हरित पट्टा विकास, वाहनांचे प्रदूषण, वेस्टर्न घाट अधिसूचनेनुसार क्षेत्रातील कुठली गावे मोडतात, याबाबत माहिती दिलेली नाही. ती माहिती अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याची सूचना केली. प्रकल्प कार्यान्वित करण्यास सुरवात केल्यानंतर धुळीचे प्रदूषण नियंत्रण व उपाययोजना याबाबत माहिती सांगण्यात आलेली नाही. तरी वरिल सर्व बाबत माहिती बैठकीत देण्याची सूचना त्यांनी केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी

कंत्राटदाराची नेमणूक प्रलंबित आहे. त्यास स्वतःचा प्रकल्प सुरु करताना म.प्र.नि.मंडळाची पूर्वमान्यता घ्यावीच लागेल. म.प्र.नि. मंडळाच्या संमतीपत्रातील सर्व अटी व शर्ती पाळणे त्यास बंधनकारक राहिल. तोपर्यंत कंत्राटदारास आम्ही काम करु देणार नाही.

**डॉ. पद्मश्री बैनाडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी खालील मुददे उपस्थित केले:-**

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही दोन मुद्दे उपस्थित केले. त्यांनी सांगितले की प्रकल्प हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. जरी रायगड जिल्ह्यात फक्त ५ कि.मी. लांबी असली, तरीही परिसराच्या विकासासाठी ती एक संधि आहे. मात्र बांधकाम करताना रात्री अपघात होणे, पावसाळ्यात अपघात होणे,बांधकामामुळे खड्डे पडणे, दर्शनी पाट्या (Sign Boards) न लावल्याने नागरिकांना त्रास होणे हे ब-याच वेळा आढळून येते. तरी वरिल प्रकल्प मुदतीत होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे दर्शनी पाट्या, सूचना फलक ह्या निर्देशांपेक्षा जास्त लावल्या तरी चालतील, पण कमी लावू नये. गावक-यांना त्यामुळे बाधा उत्पन्न होऊ नये अशी सूचना केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न विचारला की सादरीकरणात हा खाजगी प्रकल्प आहे असे सांगितले व ४९ कोटी दाखविले याबाबत स्पष्टीकरण द्यावे. त्याचप्रमाणे पर्यावरण अंदाजपत्रकाबाबत स्पष्टीकरण विचारले.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देताना सांगितले की अध्यक्षा यांनी प्रकल्प मुदतीत पूर्ण करण्याची सूचना केली. त्यांनी सांगितले की तलासरीपासून मोरबे पर्यंत सर्व गावातून मोजणीसाठी फिरलो, तर अत्यंत आनंदाची बाब की पनवेल तालुक्यात स्थानिकांनी कोणतीही अडचण आणली नाही. मोजण्या अत्यंत शांतपणे झाल्या. मोबदला घोषित होऊन त्याचे वाटप झाले. स्थानिकांचे सहकार्य भूसंपादन करताना मिळालेले आहे. तेच सहकार्य आम्हांला व काम करणा-या

संस्थेस मिळाले तर प्रकल्प निश्चितच मुदतीत पूर्ण होईल. प्रकल्प लवकर पुर्ण होण्यासाठी २५ कि.मी. चेच पॅकेज केलेले आहेत. पूर्वी १०० कि.मी. असत. त्यामुळे दीड ते दोन वर्षात काम पुर्ण होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींचाही या प्रकल्पाबाबत पाठपुरावा आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी पुढे सांगितेल की अध्यक्षा यांनी रस्ता सुरक्षिततेबाबत मुद्दा उपस्थित केलेला होता. तर मागील महिन्यात रस्ता सुरक्षितता अभियान एक महिन्यासाठी सादर करण्यात आलेले होते. त्यावेळी जनजागृत्तीसाठी वेगवेगळे कार्यक्रम हाती घेण्यात आलेले होते. रस्ता सुरक्षिततेसाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यावतीने रस्ता सल्लागार यांची नियुक्ती करण्यात येईल. रस्ता सल्लागर बांधकाम काळात व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरही रस्ता सुरक्षिततेचा आढावा घेईल. कंत्राटदार स्वतःचा एक सल्लागार नेमेल की जो त्यांच्या तज्ज्ञ व्यक्तीकडून सर्व आराखडे तपासून घेईल. त्यावर Safety Consultant सुरक्षा सल्लागार (Safety Consultant ) देखरेख ठेवेल. त्याचप्रमाणे जिल्हा सुरक्षा समिती बैठकीत काही सूचना आल्यास त्याही पाळण्यात येतील. प्रकल्प कार्यान्वित करताना आधुनिक तंत्रज्ञान अवलंबिण्यात येईल. जेणेकरुन अपघात कमीतकमी होतील. मानवी जीवांचे व प्राण्यांचे नुकसाना कमीतकमी होईल याची काळजी घेण्यात येईल.

अध्यक्षांनी विचारलेल्या पर्यावरण अंदाजपत्रकाबाबत स्पष्टीकरण देताना प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरण देखरेखीसाठी जवळजवळ ४८ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यातील २३.८८ कोटी हा खर्च भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रत्यक्षपणे करणार आहे. तो खर्च वनखात्यामार्फत करण्यात येतो. वनखात्यास ते पैसे देण्यात येतील. वनखात्याच्या देखरेखीखाली हरितपट्टा विकसित करण्यात येईल. ज्यावेळी कंत्राटदार काम करण्यास सुरवात करेल, त्यावेळी कंत्राटदारास काही रक्कम ही देण्यात येईल, ती झाडे लावणे, पर्यावरण प्रशिक्षण, रस्त्याच्या बाजूस हरितपट्टा विकास करणे त्या संपूर्ण कामासाठी ४८ कोटी खर्च करणार आहोत.

अध्यक्षा यांनी तिसरा मुद्दा रस्त्यांवरिल खड्ड्याचा उपस्थित केला. तर हे क्षेत्र अतीपावसाचे आहे. त्याचरप्रमाणे स्थानिक बांधकाम करताना रस्त्याच्या उंचीवर बांधकाम करतात. त्यामुळे पावसाळ्यात घरातील पाणीही रस्त्यावर येते. रस्त्याला गटाराचे स्वरुप येते. जिथेजिथे डांबराचे रस्ते आहेत, तेथे पाण्याने खडी व डांबर यांच्यातील बंधन सुटते. तर आता संपूर्ण रस्ते हे काँक्रीटचे असणार आहेत. त्यामुळे त्यावर खड्डे पडणार नाहीत. पथकर घेताना वेळोवेळी देखभाल करणे बंधनकारक असेल. जर खड्डे पडले तर त्यास संबंधित कंत्राटदार यांना जबाबदार धरण्यात येईल. त्याच्याकडून दुरुस्ती करण्यात येईल. रस्त्याचा दर्जा चांगला राखण्यात येईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता. त्यावेळी अध्यक्षा यांना सांगितले की कोविडजच्या पार्शभूमीवर सदरहू जनसुनावणी सत्रात १०० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली होती. तरी ह्या सत्रातील जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले. बैठकीच्या बाहेर जर इतर स्थानिक जनसुनवाणी उपस्थित असल्यास त्यांच्यासाठी पुढील सत्र सुरु करण्यात येईल. सदर जनसुनावणीसाठी ऑनलाईन (Webex) प्रणालीद्वारे कोणीही उपस्थिती नोंदवली नाही.

काहीवेळाने पर्यावरण समितीने बैठकीच्या स्थानाबाहेर कोणीही नसल्याची खात्री केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक प्रश्न विचारले त्याबाबत त्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की उपस्थितांनी केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद बैठकीच्या इतिवृतान्तात घेण्यात येणार असून सदरहू इतिवृत्त मराठी व इंग्रजीमध्ये अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल. या प्रकल्पाबाबत मंडळास ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तकाने दिलेले उत्तर या इतिवृत्तासोबत जोडली आहेत. (सहपत्र- "अ").

आयोजक  यांनी मा. अध्यक्षाच्या परवानगीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहिर केले.

अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(सचिन आडकर)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
म.प्र.नि.मंडळ,
नवी मुंबई

**(धनंजय पाटील)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड,
म.प्र.नि.मंडळ,
नवी मुंबई

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड